कृषी विभागातील कृषि सहाय्यकांनी तीन वर्ष करार पध्दतीने कृषि सेवक म्हणून व्यतीत केलेला कालावधी आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अदा करताना एकूण सेवेची गणना करताना ग्राह्य धरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृषिआ-१४१३/प्र.क्र.१४९/१६-अे
मंत्रालय मुंबई ४०००३२
तारीख: ११ एप्रिल, २०१८

वाचा-

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.कृषिआ-२५०२/प्र.क्र.६५६/१६-अे, दि.९ फेब्रुवारी, २००४
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.कृषिआ-२५०२/प्र.क्र.६५६(१)/१६-अे, दि.१७ फेब्रुवारी, २००४
३) दि.२० मार्च, २०१८ रोजीचा राज्य मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णय

प्रस्तावना-

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ व २ येथील शासन निर्णयांतील मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त कृषि सहाय्यकांची रिक्त पदे सुरुवातीच्या तीन वर्षाकरिता निश्चित वेतनावर कृषि सेवक म्हणून भरण्यात येतात. कृषि सेवक पदावर व्यतीत केलेला तीन वर्षाचा कालावधी हा निवृत्ती वेतनासाठी व सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करण्यासाठी अर्हताकारी सेवेची गणना करताना ग्राह्य धरण्यात येतो. परंतु सदर कालावधी आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय करताना एकूण सेवेची गणना करताना ग्राह्य धरण्यात येत नाही. कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत कृषि सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांचा कृषि सेवक पदावरील ३ वर्षाचा मानधनावरील सेवा कालावधी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनार्थ गणना करताना विचारात घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत कृषि सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांचा कृषि सेवक पदावरील ३ वर्षाचा मानधनावरील सेवा कालावधी हा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनार्थ एकूण सेवेची गणना करताना विचारात घेण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. याप्रित्यर्थ होणारा खर्च संबंधितांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखली अदा करण्यात येतात त्या लेखाशीर्षअंतर्गत उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१११४५०३८९८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Umesh Madhukar Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab39865278090eca387 93fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.04.11 14:53:02 +05'30'

(उ.म. मदन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.विधानमंडळ सदस्य
६. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव (कृषी) यांचे स्वीय सहाय्यक, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता१/२), मुंबई/नागपूर
११.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई.
१२.आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.संचालक (सर्व), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.सहसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५.विभागीय कृषी सहसंचालक (सर्व)
१६.निवडनस्ती (कार्यासन-१६-अे), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.